ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २११ वा ❑ भारतीय सौर दिनांक १९ आश्विन शके १९४८, मंगळवार दि.१३ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

परराज्यातील आलिशान वाहनांवर परिवहन विभागाची विशेष धडक मोहीम

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

आधुनिकतेच्या आणि उच्च शिक्षणाच्या शिखरावर बसलेला आजचा तरुण मानसिकदृष्ट्या किती एकाकी, कुंठित आणि हिंसक होत चालला आहे, याचा थरकाप उडवणारा पुरावा अमरावतीमध्ये समोर आला आहे. ज्या आईने बोट धरून चालायला शिकवले, त्याच जन्मदात्रीचा एका ३९ वर्षीय उच्चशिक्षित आयटी इंजिनिअरने किरकोळ वादातून गळा घोटला. पैशाने आणि शिक्षणाने माणूस प्रगल्भ होतो हा आपला समज या घटनेने पूर्णपणे खोटा ठरवला असून, या क्रौर्याने संपूर्ण समाजाच्या सद्सद्विवेकबुद्धीला हादरवून सोडले आहे.

शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवसारी रिंग रोडवरील गजानन प्लाझा परिसरात हा दुर्दैवी प्रसंग घडला. रंजना कानफाडे (वय ६०) असे मृत मातेचे नाव असून, तुषार सतीश कानफाडे असे या निर्दयी मुलाचे नाव आहे. तुषार हा अविवाहित असून तो एका आयटी कंपनीत चांगल्या पगारावर वर्क फ्रॉम होम करत होता. घरात केवळ आई आणि मुलगा असे दोघेच राहत होते. वरवर पाहता सुरक्षित आणि स्थिर वाटणाऱ्या या घरात शनिवारी सकाळी असा कोणता वाद पेटला की ज्यामुळे तुषारच्या रागाचा पारा सर्व सीमा ओलांडून गेला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, संतापाच्या भरात त्याने स्वतःच्याच आईचा गळा आवळला आणि या ६० वर्षीय माउलीचा जागीच अंत झाला.

या हत्याकांडातील सर्वात सुन्न करणारी बाब म्हणजे, गुन्हा केल्यानंतर तुषार पळून गेला नाही किंवा त्याने लपवाछपवी केली नाही. जन्मदात्रीला संपवल्यानंतर तो तिच्या मृतदेहाजवळच सुन्नपणे बसून राहिला. त्यानंतर तो स्वतः गाडगे नगर पोलीस ठाण्यात पोहोचला आणि अत्यंत निर्विकारपणे म्हणाला, ''साहेब, मी आईला संपवलंय... मी माझ्या आईचा खून केला आहे.'' स्वतःच्याच आईच्या हत्येची ही थंड कबुली ऐकून पोलिसांच्याही पायाखालची जमीन सरकली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि तुषार कानफाडेविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

एका चांगल्या नोकरीवर असलेला, उच्चशिक्षित तरुण जेव्हा रागाच्या भरात एवढे टोकाचे पाऊल उचलतो, तेव्हा ते केवळ एका कुटुंबाचे नव्हे, तर संपूर्ण सामाजिक व्यवस्थेचे अपयश असते. एका वातानुकूलित खोलीत लॅपटॉपच्या स्क्रीनसमोर जगणारा आणि वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली प्रत्यक्ष समाजव्यवस्थेपासून तुटलेला आजचा तरुण एका आभासी जगात हरवला आहे. तिथे की-बोर्डवरील बॅकस्पेस दाबून कोणतीही चूक सहज सुधारता येते, पण खऱ्या आयुष्यात रागाच्या भरात घेतलेले टोकाचे निर्णय थेट जन्मदात्रीचाच जीव घेतात, याचे भान त्याला उरलेले नाही. आईसारख्या अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि रक्ताच्या नात्यातही जेव्हा सुसंवाद संपतो, तेव्हा तिथे संशयाची, रागाची आणि हिंसेची भयंकर पोकळी निर्माण होते.

आधुनिकतेच्या झगमगाटात आणि उच्च शिक्षणाच्या शिखरावर बसलेला आजचा तरुण मानसिकदृष्ट्या किती एकाकी, कुंठित आणि हिंसक होत चालला आहे, हे अमरावतीच्या या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या घटनेने उघडे पाडले आहे. आपण आजवर प्रगतीची व्याख्या केवळ मोठ्या पदव्या, परदेशातील नोकऱ्या आणि गलेलठ्ठ पगार यांपुरतीच मर्यादित करून ठेवली आहे. पण ज्या शिक्षणाने माणसाला संकटातही माणूस म्हणून जगायला शिकवायला हवे, तेच शिक्षण आज कुठेतरी उणे पडत आहे. एका वातानुकूलित खोलीत लॅपटॉपच्या स्क्रीनसमोर जगणारा आणि वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली प्रत्यक्ष समाजव्यवस्थेपासून तुटलेला आजचा तरुण एका आभासी जगात हरवला आहे. तिथे की-बोर्डवरील बॅकस्पेस दाबून कोणतीही चूक सहज सुधारता येते, पण खऱ्या आयुष्यात रागाच्या भरात घेतलेले टोकाचे निर्णय थेट जन्मदात्रीचाच जीव घेतात, याचे भान त्याला उरलेले नाही. आईसारख्या अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि रक्ताच्या नात्यातही जेव्हा सुसंवाद संपतो, तेव्हा तिथे संशयाची, रागाची आणि हिंसेची भयंकर पोकळी निर्माण होते.

आजकालच्या तरुणाईमध्ये सहनशीलता अक्षरशः शून्यावर आली आहे. प्रत्येक गोष्टीत इन्स्टंट परिणामांची सवय झाल्यामुळे, मनाविरुद्ध एखादी छोटीशी गोष्ट घडली तरी त्यातून येणारे नैराश्य आणि संताप पचवण्याचे मानसिक बळ त्यांच्यात उरलेले नाही. कृतज्ञता आणि त्याग हे शब्द तर जणू आजच्या पिढीच्या शब्दकोशातूनच हद्दपार झाले आहेत. हे केवळ एका कुटुंबाचे, त्या आईचे किंवा त्या इंजिनिअर मुलाचे वैयक्तिक अपयश नाही; तर ती आपल्या संपूर्ण समाजव्यवस्थेला लागलेली मोठी कीड आहे. आपण मुलांना जीवघेण्या स्पर्धेत जिंकायला तर शिकवले, पण नाती कशी जपायची, थोरामोठ्यांचा आदर कसा करायचा आणि भावनांवर नियंत्रण कसे मिळवायचे हे शिकवायला आपण सोयीस्करीत्या विसरलो. एकत्र कुटुंबातील संस्कारांची जागा आता स्मार्टफोन्सने घेतली आहे आणि जिव्हाळ्याच्या संवादाची जागा सोशल मीडियाने व्यापली आहे. राग, नैराश्य आणि हिंसेच्या या अंधाऱ्या गर्तेत आपली तरुण पिढी अत्यंत वेगाने ओढली जात आहे.

आता वेळ आली आहे की समाजाने स्वतःच्या आत डोकावून, या निगरगट्ट होत चाललेल्या मानसिकतेचे अत्यंत कठोर आत्मपरीक्षण करावे. जोवर आपण या डिजिटल पिढीला केवळ एक यंत्र न बनवता पुन्हा एकदा संवेदनशील माणूस म्हणून घडवण्याची सामूहिक जबाबदारी घेत नाही, तोवर अशी रक्ताची नाती विखुरताना आपण केवळ मूकदर्शक बनून राहू.

आजकालच्या तरुणाईमध्ये सहनशीलता अक्षरशः शून्यावर आली आहे. प्रत्येक गोष्टीत इन्स्टंट परिणामांची सवय झाल्यामुळे, मनाविरुद्ध एखादी छोटीशी गोष्ट घडली तरी त्यातून येणारे नैराश्य आणि संताप पचवण्याचे मानसिक बळ त्यांच्यात उरलेले नाही. कृतज्ञता आणि त्याग हे शब्द तर जणू आजच्या पिढीच्या शब्दकोशातूनच हद्दपार झाले आहेत. आपण मुलांना जीवघेण्या स्पर्धेत जिंकायला तर शिकवले, पण नाती कशी जपायची आणि भावनांवर नियंत्रण कसे मिळवायचे हे शिकवायला आपण विसरलो. राग, नैराश्य आणि हिंसेच्या या अंधाऱ्या गर्तेत आपली तरुण पिढी नेमकी कुठे चालली आहे? या प्रश्नांची उत्तरे आता केवळ पोलिसांच्या तपासातून मिळणार नाहीत, तर समाजाला त्याचे अत्यंत कठोर आत्मपरीक्षणच करावे लागेल.

सीएसआर फंडातून मनपा शाळेचा कायापालट

मनपा कें. प्रा. मा. शाळा एन-७ सिडको शाळेची देदीप्यमान कामगिरी!

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन ७, सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेच्या इमारतीचे बांधकाम फोरब्स कंपनी अँड लिमिटेड शापूरजी पालनजी ग्रुप या कंपनीकडून सीएसआर फंडातून पूर्ण करण्यात आले. २०१८ पूर्वी शाळेचे इमारत जुनी होती. तत्कालीन मुख्याध्यापिका हेमलता भुयार यांनी फोरब्स कंपनीशी संपर्क साधून सीएसआर फंड मिळवला. चार टप्प्यात सदरील शालेय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. २०१८ साली शालेय इमारतीतील चार खोल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. २०२२ मध्ये पाच खोल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. २०२५ साली सहा खोल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. २०२६ साली सात वर्ग खोल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. अशाप्रकारे २२ वर्ग खोल्यांनी सुसज्ज सुंदर अशी इमारत ऑक्टोबर २०२६ आली पूर्ण करण्यात आली. सदरील शालेय इमारतीचे बांधकाम अदमासे एकूण सात कोटी रुपयांचे आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. अमोल येडगे सर, अतिरिक्त आयुक्त मा. श्री. रणजित पाटील सर, उपायुक्त मा. श्री. अंकुशजी पांढरे सर, शिक्षणाधिकारी मा. श्री. भारत तीनगोटे सर, प्रशासन अधिकारी श्री. संजीव सोनार सर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री. ज्ञानदेव सांगळे सर, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. विजय कोल्हे सर यांच्या मार्गदर्शनाखाली



शाळेची सर्वच क्षेत्रात प्रगती होत आहे.बालवाटिका विद्यार्थी प्रगतीसाठी श्रीमती संगीता बोरसे, श्रीमती सुनंदा सदावर्ते, श्रीमती सुवर्णा विघोतेकर मेहनत घेत आहेत. पहिली ते पाचवीच्या विदयार्थ्यांना मूलभूत ज्ञान देण्यासाठी व त्यांचा पाया पक्का करण्यासाठी श्रीमती स्वाती घोडतुरे, श्रीमती शिल्पा बहुरे, श्रीमती सुनीता पाटील, श्रीमती वैशाली सुरडकर प्रामाणिकपणे परिश्रम घेत आहेत. सहावी ते आठवीतील विदयार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणे शिकवण्यासाठी श्रीमती मंगला महाजन, श्रीमती अंजली कुलकर्णी, श्रीमती दीपाली औटे कार्यरत आहेत. माध्यमिक स्तरावरील ९वी व १० विच्या विदयार्थ्यांना शिकवण्यात सौ. मंजुश्री जाधव, सौ. वैशाली चव्हाण, श्री. वेंकट जाधव, श्रीमती शुभांगी चव्हाण मेहनत घेत आहेत. ऑटोमोबाईल व मल्टिस्किल या विषयांचे अध्यापन प्रभावीपणे श्री. दीपक पडोळ व श्री संदीप कलंबे करत आहेत. कला,कार्यानुभव,क्रीडा या विषयांचे निदेशक अतिशय छान रीतीने विदयार्थ्यांना शिकवत आहेत. संगीत शिक्षक श्री. सुशील दांडगे विदयार्थ्यांना सुंदर पद्धतीने संगीत शिकवतात.डी मार्ट एज्युकेशन फाउंडेशन द्वारे नवीन शालेय इमारतीमध्ये वीस संगणकांचे प्रयोगशाळा उपलब्ध झाली आणि विद्यार्थ्यांना संगणक शिकवणारे शिक्षक देखील उपलब्ध झाले. तसेच डी मार्ट एज्युकेशन फाउंडेशन तर्फे विद्यार्थ्यांना २००० पुस्तकांची लायब्ररी प्राप्त झाली. लायब्ररीयन म्हणून एक शिक्षक देखील नियुक्त करण्यात आला.प्रशासन अधिकारी मा. श्री. संजीव सोनार सर यांच्या मार्गदर्शनाने व मुख्याध्यापक श्री. मनोज अग्रवाल यांच्या प्रयत्नाने विद्यार्थ्यांना ने आण करण्यासाठी ऑगस्ट २०२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे मोफत सिटी बसेस सुरू करण्यात आल्या. श्रीमती मंगला महाजन मॅडम यांच्या मार्गदर्शनाने शाळेतील एक विद्यार्थीनी इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन येथे अभ्यास दौऱ्यासाठी २०२५ साली गेली होती.२०२१ साली श्रीमती वैशाली देशमुख छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे १२ विद्यार्थी यांनी तयार केलेला सॅटॅलाइट प्रक्षेपित करण्यासाठी सदरील शाळेचे एक विद्यार्थ्याने निवडण्यात आली होती. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये या उपक्रमाचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांचे गुणवत्ता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न होत आहेत. सिटी बसेस सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि गुणवत्ता यांच्यामध्ये वाढ झाली आहे. संस्कृती संवर्धन या विषयानुसार विद्यार्थ्यांना सुसंस्कारीत करण्यासाठी श्रीमती अंजली कुलकर्णी मेहनत घेतात. शाळेचे मुख्याध्यापक श्री मनोज अग्रवाल, क्रीडा प्रशिक्षक श्री सागर मगरे, क्रीडा निदेशक श्री प्रीतीश सराटे यांच्या प्रयत्नाने शाळेत क्रीडा क्षेत्रात विद्यार्थी प्रगती करत आहेत. शाळेची विद्यार्थिनी श्रुतिका बोळगे हिने वेटलिफ्टिंग मध्ये जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत शाळेची विद्यार्थिनी आराध्या कुबेर यांनी सुवर्णपदक पटकावले आहे. शाळेतील विद्यार्थी क्रीडा प्रकारात प्रगती करत आहेत. श्रीमती दीपाली औटे यांच्या मार्गदर्शनाने महात्मा गांधी अखिल भारतीय साहित्य संमेलनात शाळेची इयत्ता आठवीची विद्यार्थिनी प्राजक्ता शामस्कर हिने निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे ६००० रुपये रकमेचे रोख बक्षीस आणि प्रमाणपत्र मिळवले.सदरील शाळेअंतर्गत असणाऱ्या सी. बी. एस. ई.शाळेत शिकवणाऱ्या श्रीमती फिरदोस नदाफ, श्रीमती सबासदफ सिद्दीकी, श्रीमती अमृता शिंदे, श्रीमती रोहिणी नागरे अतिशय प्रामाणिकपणे विदयार्थ्यांना शिकवत आहेत.शाळेतील सेवक श्री.रमेश देवडे,श्री. विजय गायकवाड, श्री.अविनाश भोंबे शाळेतील सेवेसाठी तत्पर असतात. शाळेची सर्व क्षेत्रात प्रगती होत आहे.

ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे निधन

ज्योतिर्मय साहित्य

अहिल्यानगर – लोक रंगभूमी, नाटक, मालिका व मराठी, हिंदी चित्रपटातील सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे दि. १२ ऑक्टोबर सकाळी ७ वाजता येरवडा येथील निवासस्थानी दुःखद निधन झाले.

मृत्यू समयी त्यांचे वय ७४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन बहिणी, एक भाऊ, मुलगा, सून व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर आज सायंकाळी ५ वाजता येरवडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

नोव्हेंबर २०१६ मध्ये माटुंगा येथील नाट्यगृहात लावणीचा कार्यक्रम सादर करत असतानाच त्यांना अर्धांगवायूचा झटका येऊन त्या नृत्य करत असतानाच रंगमंचावर कोसळल्या होत्या. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेव्हापासून त्यांच्यावर घरीच उपचार सुरू होत त्यामुळे त्या सलग ९- १० वर्षे अंथरुणावर खीळून होत्या.

मधू कांबीकर या मूळच्या शेवगाव तालुक्यातील कांबी या गावच्या रहिवासी होत्या. कांबी पासून काही किलोमीटर अंतरावर असलेल्या मालेगाव या गेवराई तालुक्यातील छोट्याशा खेडेगावात त्यांचा जन्म झाला होता. त्यांचे बालपण कांबी या गावामध्ये गेले तर ७ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कांबी येथे झाले.

पुढे पुणे आणि कोल्हापूर येथे जाऊन त्यांनी लावणीचे नृत्य प्रशिक्षण घेतले. तत्पूर्वी गेवराई, बीड या भागात संगीत बारी कलाकेंद्रातही त्यांनी काही काळ नृत्य केले. पुढे पुण्याच्या आर्यभूषण थिएटर मध्ये आणि त्यानंतर लालबाग परळ येथील हनुमान थिएटर मध्ये त्यांनी आपली पार्टी चालवली. पुत्र कामेष्टी या नाटकाद्वारे १९८० साली त्यांचे रंगभूमीवर पदार्पण झाले.

पुढे नाटक, मालिका, चित्रपट, हिंदी चित्रपट क्षेत्रात यशस्वी झाल्यानंतर त्यांनी सखी माझी लावणी हा अस्सल पारंपरिक लावण्यांचा कार्यक्रम देखील सुरू केला होता. कांबी हे आपले गाव आणि शेवगावशी संबंध होता. तीन भाऊ, तीन बहिणी आणि आई वडील असे त्यांचे मोठे कुटुंब होते.

वडिलांच्या निधनानंतर त्यांनी कांबी या आपल्या गावात एक सार्वजनिक वाचनालय सुरू केले होते. तर दरवर्षी दिवाळीला त्या हमखास कांबी या गावी सुट्टीसाठी येत असत. त्याचबरोबर नगर जिल्ह्यात कुठेही लोककलेशी संबंधित काही कार्यक्रम किंवा लोककलावंतांचा मेळावा असेल तर त्या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहत असत. शेवगावच्या मार्केट यार्ड मध्ये काही वर्षांपूर्वी अशाच एका लोककलावंतांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमास देखील मधुकांबीकर उपस्थित होत्या आणि कार्यक्रम संपल्यानंतर काही काळ त्या शेवगावच्याच डॉ. कुलकर्णी यांच्या बंगल्यात चहापानासाठी थांबल्या होत्या. त्यावेळी त्यांची मुलाखत घेण्याचा योग आला होता. त्यावेळी त्यांनी लोक रंगभूमी, लावणी, लोककला, मराठी, हिंदी चित्रपट यासंदर्भात भरभरून बोलल्या होत्या.



त्यांची आपल्या कांबी येथील शिव मंदिरावर खूप अपार अशी श्रद्धा होती. त्यांच्या आई शशिकला यादेखील नृत्य कलावंत होत्या. त्यामुळे नृत्याचे प्राथमिक धडे त्यांना आपल्या आईकडूनच मिळाले. पुढे त्यांनी लक्ष्मीबाई कोल्हापूरकर यांच्याकडून नृत्याचे धडे घेतले पांडुरंग घोटकर गुरुजी यांनी त्यांना ढोलकी वर साथ दिली. त्यांच्यासोबत त्यांच्या बहिण रत्नाताई नेहमी असत.

सिंदखेड राजा जवळील पिंपरी राजा येथील विश्वास आनंद महाराजांच्या मंदिराच्या बांधकामासाठी त्यांनी सखी माझी लावणी या कार्यक्रमाचे प्रयोग सादर करून आर्थिक मदत गोळा करून दिली होती.

१९८१ च्या सुमारास दिल्ली येथे झालेल्या लोककला महोत्सवात त्यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासोबत फुगडी खेळली होती.

सुरुवातीच्या काळात त्यांनी देवापुढे माणूस, सौभाग्य दान, दगा, लक्ष्मी अशा काही चित्रपटात छोट्या भूमिका साकारल्या होत्या. राजदत्त दिग्दर्शित शापित या चित्रपटाद्वारे खऱ्या अर्थाने त्यांचे मराठी चित्रपटात पदार्पण झाले. त्यानंतर हेच माझे माहेर, आज झाले मुक्त मी, नाना पाटेकर सोबतचा राघू मैना हा तमाशापट, निखारे, देवा शपथ खरं सांगेन, बिनकामाचा नवरा, जुलूम इत्यादी चित्रपटात त्यांनी विविध व्यक्तिरेखा साकारल्या.

१९८० ते ९० या दशकामध्ये रंजना नंतर विविध व्यक्तीरेखा साकारणाऱ्या अभिनेत्री म्हणून मधू कांबीकर यांची चर्चा सुरू झाली होती. कधी तमाशाच्या बोर्डावर नाचणारी नृत्यांगना तर कधी सोज्वल गृहिणी, सोशिक आई किंवा ठसकेबाज ग्रामीण स्त्री अशा विविध रंगी भूमिका त्यांनी आपल्या अभिनयातून साकारल्या.

एक होता विदूषक या जब्बार पटेल दिग्दर्शित मराठी चित्रपटासाठी त्यांनी मध्यवर्ती भूमिका साकारली होती.

त्याचबरोबर दादा कोंडके, महेश कोठारे, सचिन या दिग्गज अभिनेता निर्माता दिग्दर्शकांसोबतही त्यांनी अनेक चित्रपटातून भूमिका साकारल्या. नाना पाटेकर यांच्यासोबत राघू मैना या मराठी चित्रपटानंतर तब्बल २५ वर्षांनी त्यांनी नाना पाटेकर यांच्यासोबत हम दोनो या हिंदी चित्रपटात देखील महत्त्वाची भूमिका साकारली होती. त्यानंतर गोविंदाची मध्यवर्ती भूमिका असलेल्या शोला और शबनम या चित्रपटात देखील त्यांनी आपली भूमिका साकारली

पुढे सातवा आसमान, दिल तुने लिया, जगन्नाथ अशा अनेक हिंदी चित्रपटातून त्या झळकल्या. होळी रे होळी, बिचारा लक्षा, गिनीपिग, न्यायदेवता, वैभव, सर्जा राजा या त्यांच्या दूरदर्शन मालिका खूप गाजल्या.

२०१३ मध्ये मधू कांबीकर यांना पद्मश्री दया पवार सांस्कृतिक पुरस्कार मिळाला होता. अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथील अगस्ती महाविद्यालयात आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड आणि महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला होता.

प्रेमानंद रूपवते यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले होते.




जात्यावरच्या ओव्या.....

माय माऊलीची माया
बाळ बसत मांडीवर
नाही ओळखत कुणा
मावश्या याला खंडीभर ||८८७||

माय माऊलीची माया
उदरी सांभाळते कोंब
नऊ महिने सरता
देवा येवून थोडा थांब ||८८८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७९





ज्योतिर्मय साहित्य

मना पावना भावना राघवाची ।
धरी अंतरी सोडी चिंता भवाची ।
भवाची जिवा मानवा भूलि ठेली ।
नसे वस्तूची धारणा वेर्थ गेली ।

अर्थ : हे मना श्रीरामांचे स्मरण पवित्र करणारे आहे. त्यांचे स्मरण कायम आपल्या अंतरात म्हणजे म्हणजे मनामध्ये ठेव. संसाराची चिंता सोडून दे. या संसाररूपी मायेची भूल मानवाला पडते. जी गोष्ट अस्तित्वातच नाही, अशा गोष्टीची कास धरणे व्यर्थ आहे.


(पावना - पवित्र, भावना- विश्वास/स्मरण, धरी - धारण कर, भवाची - संसाराची, भूलि - भ्रम, वेर्थ - व्यर्थ)


आधीच्या श्लोकात आपल्याला समर्थांनी देह, संसाराची व्यर्थ चिंता वाहू नका असे सांगितले. या श्लोकात ते आपल्याला हा संसार कसा नश्वर आहे ते सांगत आहेत. आपल्या मनामध्ये नेहमीच या संसाराबद्दल एक आंतरिक ओढ किंवा ममत्व असते. शिक्षण, नोकरी, विवाह, मुलेबाळे, पैसा, जमीनजुमला यातच आपल्या जीवनाचे सार्थक आहे असे आपल्याला वाटते. माणूस आयुष्यभर त्यासाठी धडपडत राहतो. परंतु या संसाराची व्यर्थता त्याला शेवटी लक्षात येते. पण त्यावेळी वेळ निघून गेलेली असते.

राघवाचे स्मरण, त्याच्यावरील दृढ श्रद्धा मनाला पवित्र करणारी आहे. कारण तो पतितांना पावन करणारा आहे. आपल्या अंतरात अनेक बऱ्या वाईट भावना, वासना ठाण मांडून असतात. परंतु भगवंताच्या नामाने वासना शुद्ध होत जाते. म्हणूनच समर्थ म्हणतात की हे मना पवित्र करणाऱ्या राघवाची श्रद्धा अंतर्यामी बाळग. त्यासाठी धरी अंतरी हे शब्द समर्थांनी वापरले आहेत. अंतर्यामी काय धारण करायचे ? तर राघवाचा विश्वास. आणि काय सोडायचे ? तर चिंता भवाची आपण संसारात असताना एवढे त्यात गुंतलेले असतो, की पुढे माझे कसे होईल, म्हातारपणी मुले मला विचारतील ना ? एक ना दोन अशा अनंत चिंता मन करीत राहते. संसाराची व्यर्थ चिंता करून उपयोग नाही. म्हणूनच ही चिंता टाकून द्यावी असे समर्थ सांगतात.

(क्रमशः)







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नाम व विकल्प !

ज्योतिर्मय साहित्य

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही, अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे, नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून, विकल्पांच्या उच्चाटनाची गुरुकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा, हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरुवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले चालणे चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तरी आपण आपले नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील.

पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती निःशंक होतेच होते.

॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

आपले सण आपले उत्सव
पितृपक्ष

आपल्या घरात मूल पुत्र नसताना मृत्यू पावलेले, अपघाताने विवाह आधीच मृत्यू पावलेले, असे काका आजोबा कोणी असतात. अशा नाही याप्रसंगी अन्न व जल मिळावे म्हणून कृतज्ञतापूर्वक यांची आठवण काढून त्यांना पिंडदान करावे. या पक्ष पंधरवाड्याच्या दरम्यान चतुर्दशीला महालय होत नाही या तिथीलाच मरण पावलेल्या लोकांसाठी महालय हे द्वादशी किंवा अमावस्येला करतात व ज्या व्यक्तींचा मृत्यू शस्त्राने चतुर्दशीला झाला आहे त्यांचेच केवळ महालय चतुर्दशीस होते.

वर्षातून एकदा येणारा हा महालय पर्व सर्वांनी आदराने आणि भक्ती भावाने संपन्न करावा ही इच्छा.

श्राद्धाचे महत्त्व, त्याचा विधी, त्याचे नियम, हे सर्व पुराणातून घेतलेले आहेत. ही पुराणे सात्विक आणि परि शूद्ध बुद्धी असणाऱ्या ऋषीमुनींनी लिहिलेली आहेत. यांच्या बुद्धिमत्ते वर कोणास आक्षेप असेल व स्वतःच्या बूद्धीनेच, या गोष्टीत तथ्य नाही असे वाटत असेल तर, त्यांच्यासाठी हा लेख नाही. पुराणातील उपदेश आपणा सर्वांना ज्ञात व्हावा, म्हणून इथे देण्यात येत आहे.

या पावन प्रसंगी आपण सारे आपल्या पितरांना स्मरण करूयात. त्यांच्या आशीर्वादामुळे आपले ऐहीक जीवन सुखमय व्हावे, म्हणून त्यांना वंदन करूयात. आपल्या हातून काही चुका, त्रुटी झाल्या असतील तर त्यांनी उदार मनाने आपणास क्षमा करावे, ही प्रार्थना करून हा भाग इथे संपवूयात.



नमोनमो ते विकसित भारत

मित्रांनो, मा.पंतप्रधान नरेंद्र मोदीनी पंतप्रधान पदाच्या 2 टर्म पूर्ण करून 2024 पासून त्यांची तिसरी टर्म सुरू आहे. देशात आणि अंतराष्ट्रीय राजकारणात एक वेगळीच छाप पाडणारा असा नेता असं जग मानत आहे. म्हणून अमेरिकेपासून ते आशियातील अनेक देश भारताकडे आशेने पाहतात आदर करतात. राजकारणाकडे नरेंद्र मोदी सत्तेपेक्षा सेवा म्हणून पाहिलेले आहे. मोदीजीनी गुजरात राज्याला आपत्ती व्यवस्थापन असो, व्यवसाय ऊद्योग, विकास वा डिजीटल वा कल्याणकारी योजना एक जागतिक मॅडल बनविले. सर्व देशात भ्रष्टाचाराला पायबंद, लालफितीचा अडसर कमी, अधिकारी व प्रशासकीय सुधार, पारदर्शकता आली.सरकारी फायली, बाबू याना थोडा बडगा दाखवून भारतातील गावागावात योजना व अभय दिले.सर्व समाजाला विश्वास दिला. तुमची कोणतिही व्यक्ती मागे राहणार नाही हा विश्वास. त्यामुळे विकासाला चालना मिळाली. आघाडीची सरकारे असूनही "सबका साथ सबका विकास "ही एक नांदी ठरली! ही त्यांची मोठी ऊपलब्धी आहे. हे आजचे सर्व विरोधी पक्ष व त्यांचे नेतेही मान्य करतात. आज भारत देश सामर्थ्य, संकल्प आणि सामुहिक कार्यातून दमदार वाटचाल करत आहे. याच कारणामुळे छोटी राष्ट्रे आणि त्यांचे पंतप्रधान भारताकडे आशेने पाहतात मा. मोदीजी मानतात की, जेवढे ऊच्च पद तेवढी मोठी जबाबदारी. कोणत्याही खात्याच्या मंत्र्यांना ते नोकरशहा मानत नाही.ते म्हणतात "मंत्री असो की अधिकारी वा आमदार खासदार यांनी आपापली जबाबदारी समजावी व सेवक म्हणून कार्य करावे. तर असो एवढे बस करतो व थांबतो. आवडले तर लाईक शेअर करा आणि वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा सुप्रभात.



लिंबूचे आयुर्वेदिक फायदे



ज्योतिर्मय साहित्य

लिंबात व्हिटॅमिन-सी चे प्रमाण खूप जास्त असते. हे शरिरासाठी अँटिऑक्सिडंट म्हणून कार्य करते, जे मुक्त रॅडिकल्सला तटस्थ करते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार, पक्षाघात आणि कमी रक्तदाबाचा धोकाही कमी होतो. सरासरी आकाराच्या लिंबाच्या रसात ३१ पर्यंत व्हिटॅमिन-सी असते, तर प्रौढ व्यक्तीला दररोज ६५ ते ९० व्हिटॅमिन-सी आवश्यक असते.

वजन घटवण्यात मदत करतो : लिंबूत असलेले पॉलीफेनॉल अँटीऑक्सिडंटमध्ये वजन कमी करण्याचे गुणधर्म आहेत. लिंबूत असलेले अँटिऑक्सिडंट्स रक्तातील ग्लुकोजची पातळी कमी करून इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारू शकतात. या दोन्ही गोष्टी टाईप-२ मधुमेहाचे मुख्य कारण मानल्या जातात.

त्वचा सुधारते : लिंबूत असलेले व्हिटॅमिन-सी हे त्वचेवरील सुरकुत्या कमी करते. तसेच, त्वचेचा एजिंग पासून (वृद्धत्वापासून) बचाव करते आणि उन्हामुळे होणाऱ्या नुकसानापासून त्वचेचे रक्षण करते.

पचनक्षमता मजबूत होते : बद्धकोष्ठतेपासून आराम मिळावा यासाठी सकाळी लिंबू पाण्याचे सेवन करावे. कोमट पाण्यात लिंबू मिसळून प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. लिंबू पाण्याने पचनक्रिया सुधारते.


संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

नैसर्गिक ब्रेथ फ्रेशनर : अनेक वेळा लसूण, कांदा किंवा मासे खाल्ल्यानंतर तोंडाला दुर्गंधी येते. लिंबू पाणी प्यायल्याने श्वासाच्या दुर्गंधीची समस्या दूर होते. तसेच लिंबू लाळ उत्तेजित करते.

मुतखड्याच्या आजारात मदत होते : लिंबात असलेले सायट्रिक ॲसिड मुतखड्याचा धोका कमी करू शकते. सायट्रिक ॲसिड मध्ये सायट्रेट नावाचे संयुग असते, जे लहान लहान मुतखड्याचे स्टोन्स फोडण्यास मदत करते.

ॲनिमियापासून बचाव करते : लोहाच्या कमतरतेमुळे होणारा अशक्तपणा म्हणजेच ॲनिमिया हा एक अतिशय सामान्य आजार आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला अन्नात पुरेसे लोह मिळत नाही, तेव्हा याचा त्रास होतो. लिंबूत काही प्रमाणात लोह असते.

हृदयाला हेल्दी ठेवते : जर एक लिंबू संपूर्ण खाल्ले तर शरिराला ५२% व्हिटॅमिन-सी मिळू शकते. लिंबूपाणी प्यायल्याने व्हिटॅमिन-सी भरपूर प्रमाणात मिळते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार आणि स्ट्रोक्सचा धोका कमी होतो. तसेच, लिंबूत असलेले फायबर आणि प्लांट कंपाऊंड देखील हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी फायदेशीर ठरतात.



काकासाहेब कालेलकर (भाग १)


ज्योतिर्मय साहित्य

एस. बालु राव हे इंग्रजीत प्रकाशित होणाऱ्या भारतीय साहित्य या नियतकालिकाचे संपादक होते. जाने.फेब्रू १९८६ च्या अंकातील संपादकीयात त्यांनी निबंध आणि एक निबंधकार (काकासाहेब कालेलकर) यांच्या विषयी महत्वाचे विचार मांडले आहेत. तेच थोडक्यात देत आहे.


श्री. दत्तात्रय बालकृष्ण कालेलकर (१८८५-१९८१) हे काकासाहेब म्हणून ओळखले जात. काकासाहेब अनेक क्षेत्रात पुढे होते. नेहमीचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी एक दोन शाळेत शिकविले.नंतर ते पत्नी व मुलाला सोडून हिमालयात पायी फिरण्यासाठी निघून गेले. तेथून ते शांतिनिकेतन येथे रविंद्रनाथ टागोर यांच्या हाताखाली काम करु लागले.

परंतू १९१५ साली गांधीजींच्या शांतिनिकेतन भेटीत त्यांना महत्वाचे मार्गदर्शन मिळाले. तेव्हा पासून गांधीजीचे विचार काकासाहेबांचे कायम मार्गदर्शक राहिले. नंतर ते स्वातंत्र्य सैनिक झाले.सामाजिक व राजकीय कार्यकर्ते झाले.पत्रकार, प्रकाशक, शिक्षणतज्ञ झाले. स्वातंत्र्य पूर्व काळात जेल मध्ये जाणे येणे होत गेले. स्वातंत्र्यानंतर ते राज्यसभा सदस्य झाले. त्यांनी अनेक समित्यावर काम केले. सांस्कृतिक यात्रेकरु म्हणून परदेशास भेटी देऊन आले. त्यांनी समन्वयासाठी प्रयत्न केले.

त्यांची सृजनशीलता त्यांना त्यांच्या समकालीन लोकात विशेष ठरवते. मूलतः ते लेखक होते. त्यांची निवड



निबंध लेखन होती. काकासाहेब महाराष्ट्रात जन्मले. त्यांची मातृभाषा मराठी. पण लवकरच ते गुजराथी शिकले. साबरमती येथील आश्रम शाळेत त्यांनी शिकविले. तसेच त्यांनी गुजराथी व हिंदी मधून लिखाण केले.



काकासाहेबांचे व्यक्तिमत्व गुजराथी लोकांसाठी आदरणीय होते. काकासाहेबांची निरीक्षण शक्ति, कल्पकता, प्रचंड अनुभव आणि मोठा शब्दसंग्रह त्यांच्या लिखाणात दिसून येतो.

त्यांच्या जीवन लीला या पुस्तकाचे इतर भाषेत भाषांतर साहित्य अकादमी तर्फे करण्यात आले व पुरस्कार ही दिला गेला.यात नदीवर लिहिलेले निबंध आहेत. गुजराथी साहित्यात पण हे पुस्तक वाखाणले गेले आहे. त्यानंतर सुमारे वीस वर्षांनंतर साहित्य अकादमीने त्यांच्या साहित्यावर दोन दिवसाचे चर्चासत्र घेतले होते.यावरुन त्यांच्या साहित्याचे महत्व लक्षात यावे.अकादमीने त्यांचे जीवन व कार्य यांची सविस्तर माहिती देणारे पुस्तक ही प्रकाशित केले आहे.

काकासाहेबांच्या साहित्यात आजही अर्थपूर्ण असे बरेच आहे. परंतू आपण गुलाबाच्या बागांना दगडी कुंपणात बंदिस्त करीत रहातो. आश्चर्य म्हणजे त्यांना साहित्यिक म्हणून लोक कमी ओळखतात. त्याऐवजी ते गांधीजींचे अनुयायी म्हणून ओळखले जातात.

काकासाहेबांच्या साहित्याचा विचार करत असताना निबंध या साहित्य प्रकाराची उजळणी केली पाहिजे. निबंधाचे क्षेत्र विस्तृत आहे. निबंध बुद्धीमत्तेचे प्रदर्शन करणारे पाहिजेत असे नाही. त्याऐवजी अनुभूतीचे कल्पनारम्य सादरीकरण असावे. ते व्यक्तिगत असू शकते. त्यात खेळकरपणा असावा. जवळीक असावी. ठसा उमटवणारे काही असावे.

प्रत्येक भाषेत चांगले निबंधकार होऊन गेले आहेत. पन्नासच्या दशकात निबंध जास्त प्रचलित होते. परंतू सध्या निबंधाचे महत्व वरचेवर कमी होत जात आहे का? या वर विचार करण्याची आवश्यकता आहे.

काळ बदलला आहे. लोकांवर ताण वाढलेला आहे. लोक सतत घाईत असतात. निवांतपणा मिळत नाही, वगेरे. सर्व बरोबर आहे. तरी वेगळे विषय ताकदीने निबंध स्वरूपात आणता येऊ शकतात.

ललित साहित्यात माणूस आणि नियती हा विषय असतो. निबंधाचे विषय माणसाच्या भोवती असणाऱ्या वस्तू व घडत असलेल्या गोष्टी या संबंधी असतात. त्यासाठी शाळांमधून विद्यार्थ्यांच्या निबंध लिखाणास अधिक उत्तेजन दिले पाहिजे.

***



शारदीय नवरात्र संगीत महोत्सवाचे २७ व्या वर्षात पदार्पण

११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान विविध नामवंत कलाकारांचे गायन वादन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – गेल्या २६ वर्षांपासून शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताची निष्ठेने जोपासना, संवर्धन आणि प्रसार करणाऱ्या 'शारदीय नवरात्र संगीत महोत्सवा'ने यंदा २७ व्या वर्षात पदार्पण केले आहे. ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान आयोजित या महोत्सवात विविध नामवंत कलाकारांचे गायन वादन सादर होत आहे.

महोत्सवाचे उद्घाटन रामकृष्ण मिशन आश्रम, छत्रपती संभाजीनगर येथील परम अमृतानंद महाराज यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाची सुरुवात सिद्धी सुरासे, अश्विनी पाटील, प्रसिद्धी थोंटे आणि आर्या राठोड यांनी सादर केलेल्या शारदा स्तवनाने झाली. यावेळी पं. गजानन केचे यांनी हार्मोनियम तर वेदांत रामदासी यांनी तबल्याची साथ केली.

महोत्सवाच्या पहिल्या सत्रात गोवा येथील स्वरा प्रभूगावकर यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी विविध रागांची प्रभावी मांडणी करत रसिकांची दाद मिळवली. यावेळी त्यांनी 'वद जाऊ कुणाला शरण' हे नाट्यगीतही सादर केले. त्यांना दिनेश डोळे यांनी संवादिनी तर व्यंकटेश पंडित यांनी तबल्याची साथ केली.

दुसऱ्या सत्रात पं. धनंजय जोशी यांनी आपल्या ताकदीच्या आणि प्रभावी गायनातून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी राग रागेश्वरी, नाट्यगीत आणि बंदिशी सादर केल्या. त्यांना प्रा. गजानन केचे यांनी संवादिनी तर प्रशांत गाजरे यांनी तबल्याची साथ केली.

दीपश्री, २४, भाग्यनगर, जुन्या हेडगेवार रुग्णालयामागे, छत्रपती संभाजीनगर येथे हा संगीत महोत्सव सुरू असून संगीतप्रेमींनी या मैफिलींचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिता देशपांडे आणि डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी केले आहे.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रवीण शर्मा यांनी केले.

आजच्या मैफिलीत संमीहन जोशी यांचे तबलावादन आणि कल्याणी जोशी यांचे गायन सादर होणार आहे. (मैफिलीची सुरुवात रोज संध्याकाळी सात वाजता होते.)

सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल "माझी मी भारी" नारी सन्मानाने होणार सन्मानित


ज्योतिर्मय साहित्य

कुरखेडा – रानभाज्यांची अभ्यासक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तसेच शेतकरी व गृहिणी असलेल्या मूळ गाव देऊळगाव /कुरखेडा जि.गडचिरोली येतील संगीता संतोष ठलाल गेली ३२ वर्षापासून साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत सोबतच गेली ८ वर्ष झालीत सामाजिक क्षेत्रात नि:स्वार्थ भावनेने कार्य करत आहेत. एवढेच नाही तर त्यांनी मानवी जीवनाच्या व मुक्या प्राण्यांच्या सुदृढ निरोगी आरोग्यासाठी साहित्य क्षेत्रातील पहिला असलेला "रानभाज्यांच्या जगात" हा संशोधन ग्रंथ लिहून समाजासाठी भरीव मोठे योगदान दिले आहेत. सोबतच बोलीभाषा टिकून रहावी यासाठी "झाडीचा खाजा" झाडीबोली काव्यसंग्रह सुद्धा लिहिले आहेत. आजपर्यंत एकूण ६४ वृतपत्रात लिखाण केले आहेत. त्यांचे साहित्यिक, सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदान बघून रेडीओ आकाशवाणी केंद्र नागपूर, दूरदर्शन सह्याद्री वाहिनी यांनी, त्यांची दखल घेऊन मुलाखत घेतली आहे. भारत सरकारच्या साहित्य अकादमी दिल्लीच्या वतीने आश्रमशाळा चांदाळा येथे "ग्रामलोक" या कार्यक्रमात,जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवात त्यांचे कथन झाले आहे. शासकीय व इतर संस्थेद्वारा त्यांचे ११३ सत्कार झालेले आहेत सोबतच त्यांच्या संशोधन ग्रंथास पुरस्कार प्राप्त झाले आहेत. एक सामान्य शेतकरी, गृहीणी असताना सुद्धा दैनंदिन साहित्य सेवा त्या करत असतात, व ग्रामीण भागातील विद्यार्थांना वाचणाची आवड लागावी यासाठी नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय चालवतात. आणि लिहिण्याप्रमाणे सामाजिक उपक्रम सुध्दा



राबवत असतात. प्रचंड संघर्षातून घडलेल्या संगीता ठलाल विशेष नारीशक्ती म्हणून व त्यांचे समाजासाठी भरीव असलेले योगदान बघून नाशिक येथील इनोव्हेटिव्ह मेकर्स अकॅडमी फाउंडेशन संस्थेच्या अध्यक्षा प्रा.आशा बिरारी पाटील यांनी संगीता ठलाल यांच्याकडून कोणतेही अपेक्षा न करता निशुल्क निवड करून "माझी मी भारी" नारीसन्मान जाहीर केले आहे . येत्या १८ तारखेला राणी भवन पंचवटी येथे मान्यवरांच्या हस्ते संगीता ठलाल यांना अतिशय मानाचा मानला जाणारा "माझी मी भारी" या नारी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल विविध स्तरावरून संगीता ठलाल यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.








श्रीरामरक्षास्तोत्र
मराठी भावानुवाद सहीत
भावानुवादकार - माधव मनोहर जोशी.

✍जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितः ।
स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ॥६॥
➡मराठी भावानुवाद ---
विद्याविभूषित श्रीराम करोत माझ्या जिभेचे रक्षण
अनुज भरतास वंदनीय श्रीराम करोत माझे कंठरक्षण
दिव्य शस्त्र युक्त श्रीराम करोत माझ्या खांद्यांचे रक्षण
शिवधनुष्य भंगणारे श्रीराम करोत माझे भुजारक्षण ॥६॥
✍ करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजित् ।
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः ॥७॥
➡ मराठी भावानुवाद ---
सीतामातेचे पती श्रीराम करोत माझ्या हातांचे रक्षण
परशुराम विजेता श्रीराम करोत माझ्या हृदयाचे रक्षण
खरदैत्य मारक श्रीराम करोत माझा मध्यभाग रक्षण
जांबुवंत आश्रयदाता श्रीराम करोत माझे नाभिरक्षण ॥७॥
✍सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।
ऊरू रघूत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ॥८॥
➡मराठी भावानुवाद ---
सुग्रीवाचे ईश्वर श्रीराम करोत माझ्या कटीचे रक्षण
हनुमंताचे प्रभू श्रीराम करोत माझ्या जांघांचे रक्षण
असती जे राक्षस कुल नाशक अन् रघुकुलोत्पन्न
असे ते श्रीराम करोत माझ्या उभय मांड्यांचे रक्षण ॥८॥

✍जानुनी सेतुकृत् पातु जङ्घे दशमुखान्तकः ।
पादौ विभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः ॥ ९॥
➡ मराठी भावानुवाद ---
सेतूबंधन करणारे श्रीराम करोत माझ्या गुढग्यांचे रक्षण
दैत्य रावण मारक श्रीराम करोत माझ्या पोटऱ्यांचे रक्षण
बिभीषणाचे राज्यदाते श्रीराम करोत माझ्या पावलांचे रक्षण
माझ्या सकल शरीराचे हेच प्रभू श्रीराम करोत सदा रक्षण ॥९॥
✍ एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत् ।
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ॥ १०॥
➡ मराठी भावानुवाद ---
हे रामबलयुक्त सुरक्षा कवच,नित्य पठेल जो पुण्यवान
तो सदा होईल दीर्घायु,सुखी, विजयी, विनयी अन् पुत्रवान ॥१०॥
✍पातालभूतलव्योम चारिणश्छद्मचारिणः ।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ॥ ११ ॥
➡ मराठी भावानुवाद ---
भू,पाताळ अन् आकाशगामी ऐसे ते कपटी मायावी दैत्य
ह्यांची नजर न लागे त्यांना, जे जपती ही रामरक्षा नित्य ॥११॥



॥ श्री गणेश चिंतन ॥
समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

इथे "गुरुकृपा" म्हणजे एखादी बाहेरून मिळणारी वस्तू नव्हे. ती दृष्टीतील परिवर्तन आहे.
ज्या ठिकाणी आधी—"मी देह आहे, मी कर्ता आहे, मी स्वतंत्र आहे"
अशी दृढ धारणा होती, तिथे विवेकाने प्रश्न उभा राहतो—"मी नेमका कोण?"आणि हा प्रश्न शेवटी आत्मस्वरूपाकडे नेतो.
२. पण पुढची उपमा आणखी गहन आहे
कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जली ।
मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥१३॥
ही ओवी अत्यंत सुंदर आहे.
नदी स्वतंत्र वाहत असते.तिचे स्वतःचे नाव असते.तिचा स्वतःचा प्रवाह असतो.पण गंगेत मिळाल्यावर?ती गंगाजल होते.
मग पूर्वीची स्वतंत्र ओळख पुन्हा वेगळी करता येत नाही.
३. हा केवळ भक्तिभावाचा अर्थ नाही
इथे अद्वैताची एक अतिशय सूक्ष्म छटा दिसते.
जोपर्यंत शिष्य स्वतःला स्वतंत्र मानतो —"मी" आणि "सद्गुरू" असा भेद आहे. पण ज्ञानाच्या परिपाकात प्रश्न बदलतो.
सद्गुरू मला माझ्यापासून वेगळे काही देतात का?
की—माझे खरे स्वरूपच मला दाखवतात?
हा फरक फार महत्त्वाचा आहे.
सद्गुरूने शिष्याला एखादे नवीन "स्वरूप" दिले असे नाही.
जे आधीपासूनच आहे त्यावरील अज्ञान दूर झाले.
यामुळे गुरु–शिष्य संबंधाचा अंतिम अद्वैतार्थ समजतो.
४. आणि समर्थ पुढे तर विलक्षण वाक्य म्हणतात
परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें ।
तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होये ॥ १४॥
नदी गंगेला मिळण्यापूर्वी तिला जग "लहान ओहोळ" म्हणते.
पण गंगेत मिळाल्यावर? गंगा.
आणि समर्थ म्हणतात—"तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होये"
हा शब्द थांबून वाचण्यासारखा आहे."शिष्य स्वामीच होये."
म्हणजे काय?याचा स्थूल अर्थ घेणे योग्य नाही—"शिष्य व्यक्तिशः गुरु बनतो" असा साधा अर्थ नव्हे.हा स्वरूप-अभेदाचा संकेत आहे.



महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...
विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

वडील आणि मुलगी

या ठिकाणी मला गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनमधील एक हृदयस्पर्शी प्रसंग आठवतो. या प्रसंगाचा उल्लेख मी माझ्या ' आनंदयात्री रवींद्रनाथ ' या पुस्तकात केला आहे. गुरुदेवांनी स्थापन केलेल्या या निसर्गशाळेत श्रीमंत घरातील विद्यार्थीही शिकत होते आणि अगदी गरीब कुटुंबांतीलही. शाळेतील काही श्रीमंत मुली अंगावर सोन्याचे दागिने घालून येत असत.
शांतिनिकेतनमध्ये काम करणाऱ्या एका साध्या शिक्षकांची मुलगीही तिथेच शिकत होती. त्या श्रीमंत मुलींना पाहून तिच्याही मनात आले की आपल्याकडेही असे सोन्याचे दागिने असावेत. तिने वडिलांकडे हट्ट धरला.
शांतिनिकेतनमध्ये त्याकाळी शिक्षकांना फारसे वेतन नव्हते; पण सर्व मंडळी समर्पित भावनेने ज्ञानदान करत होती. मुलीची ही इच्छा आपण पूर्ण करू शकत नाही या जाणीवेने त्या वडिलांचे डोळे पाणावले, त्यांना अतीव दुःख झाले. त्यांनी आपले हे दुःख गुरुदेवांसमोर मोकळे केले.
गुरुदेवांनी यावर एक नितांत सुंदर युक्ती शोधली! शांतिनिकेतनच्या निसर्गरम्य आवारात विविधरंगी रानफुलांची झाडे बहरलेली होती. गुरुदेवांनी त्या सुगंधी फुलांचे कलात्मक दागिने बनवून घेण्यास सांगितले. निसर्गाची ही सुंदर फुले परिधान करून जेव्हा त्या शिक्षकांची मुलगी सजली, तेव्हा तिच्या रूपापुढे सोन्याचे दागिनेही फिके वाटू लागले!
तिचा प्रश्न तर मिटलाच; पण पुढे शांतिनिकेतनमधील श्रीमंत मुलीही आपले सोन्याचे दागिने घरी ठेवून मोठ्या आवडीने फुलांचेच दागिने घालू लागल्या. एका पित्याचे दुःख गुरुदेवांनी अशा रीतीने फुलांच्या सुगंधात विरघळवून टाकले होते.

शिक्षण प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्राच्या पावन भू-मध्ये शिक्षण प्रणेत्या, समाजसुधारक, आणि भारत देशाच्या पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म झाला. आईवडील लक्ष्मीबाई खंडोजी नेवासे. यांनी सावित्रीबाईंवर अगदी बालवयातच शैक्षणिक संस्कार केले. वयाच्या नवव्या वर्षी सावित्रीबाई यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी झाला. सावित्रीबाई विवाहानंतर घरदार सांभाळू लागल्या. ज्योतिबा फुलेंनी चुलमूल याबरोबरच सावित्रीबाईंना शिक्षणाचे धडे गिरविण्यास शिकविले. सावित्रीबाई शिकू लागल्या, लिहायला, वाचायला शिकल्या.

तो काळ ज्या काळात बाई म्हटलं की केवळ चुलमूल. यापलीकडे स्त्रीचे जगणेच नव्हते. अनिष्ठ चालीरिती, रूढी, प्रथा, परंपरा या जणू स्त्रीसाठीच जन्माला आल्या होत्या. स्त्रीचे जगणे हे केवळ चौकटीच्या आतमध्येच होते. उंबरठ्या बाहेरील स्त्री म्हणजे कलंकित समजल्या जात असत. बाईने लिहायला, वाचायला शिकणे, शाळेची पायरी चढणे म्हणजे फार मोठा गुन्हा वा अपराध होता. मुलं जन्माला घालणे, उष्टी, खरकटी काढणे, चुलमूल सांभाळणे यासाठीच बाईचा जन्म असतो. हेच विचार समाजात आणि समस्त स्त्रियांच्या कानावर, मनावर बिंबवल्या गेले होते.

बाईलाही अभिमान आहे, तिलाही अभिमानाने, स्वाभिमानाने जगण्याचा तेवढाच हक्क वा अधिकार आहे. जेवढा अधिकार पुरुषांना आहे. स्त्रीला शिकण्याचा, शिक्षण घेण्याचा, लिहिण्याचा, वाचण्याचा, पुढे जाण्याचा तेवढाच अधिकार आहे. जेवढा अधिकार पुरुषांना आहे. हा विचार समाजात आणि समाजातील प्रत्येकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केला. सावित्रीबाईंनी स्त्रीयांना शिकविण्यासाठी पहिले पाऊल पुढे टाकले. मात्र समाजाकडून सावित्रीबाईंना, त्यांच्या शैक्षणिक कार्याला कडकडून संतप्त विरोध दर्शविल्या गेला.



सावित्रीबाईना खुप जाचक हाल अपेष्ठा, त्रास, अपमान सहन करावा लागला. सावित्रीबाईंवर चिखल फ कल्या गेले, शेण फेकल्या गेले, तोंडाला काळे फासले, दगड, धोंडे फेकले. खुप हिणवल्या गेले. समाजातील स्त्रियांना चुलमुलापासून, घरदारापासून दूर करण्याचे व स्त्रियांना बिघडविण्याचे काम करते आहे. असे जाचक आरोप, प्रत्यारोप सावित्रीबाईंवर केले. सावित्रीबाई फुले यांनी या सर्व जाचक अटी, त्रास, अपमान, हाल, अपेष्ठा कधी मुकपणे तर कधी प्रखरपणे समाजाला तीव्र भावना व्यक्त करत शिक्षणा बद्दलचे आपले विचार बोलून दाखविले. आणि आपली शैक्षणिक वाटचाल पुढे चालुच ठेवली.

सावित्रीबाई आणि पती महात्मा ज्योतिबा फुले यांनी १ जानेवारी सन १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. समाजातील स्त्रिया शिकण्याच्या, लिहिण्या, वाचण्याच्या ओढीने शाळेच्या दिशेने पाऊल टाकू लागल्या. चुलमूल सांभाळणाऱ्या स्त्रियांच्या ओठांवर अ, आ, इ, ई चे मधुर शब्द येऊ लागले. स्त्रिया लिहायला, वाचायला शिकल्या. याचे सर्व श्रेय क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जाते. सामाजिक विरोध, जाचक हाल, अपेष्ठा, अनिष्ठ चालीरिती, रूढी, प्रथा, परंपरा यांना हाणून पाडत शिक्षणाची धगधगती मशाल हाती घेऊन शिक्षणाची ज्योत पेटविली. आणि शिक्षणाच्या मशालिच्या तेजोमय ज्ञान प्रकाशात समस्त स्त्रिया उजळून निघाल्या.



सावित्रीबाई यांनी शिक्षणा बरोबरच समाज सुधारनेचे कार्य केले.

स्त्रियांचे अंधारमय जगणे सावित्रीबाईंनी ज्ञान तेजोमय केले. स्त्रियांच्या हातात रुढिंची, परंपरेची साखळदंड होती, अज्ञानतेच्या बेड्या होत्या. सावित्रीबाईंनी त्या बेड्या ज्ञानाच्या तलवारीने तोडल्या. स्त्रियांना शिक्षणाची वाट दाखवत त्यांच्या पावलांमध्ये त्राण भरले. स्त्रियांना शैक्षणिक स्वातंत्र्य दिले. आणि स्त्रि शिक्षणाच्या खऱ्या शिलेदार ठरल्या. स्त्रियांच्या कैवारी ठरल्या. ज्ञानाची सावली बनून समस्त स्त्रियांना आपल्या ज्ञानाच्या सावलीखाली निवारा दिला. कुठलाही भेदभाव न करता सर्व स्त्रियांना समान शिक्षण देत शिक्षणाचे दालन खुले केले. चुलमूल आणि पाळण्याची दोरी धरलेल्या हातात सावित्रीबाईंनी पुस्तक दिले. शिक्षणाबद्दलची जिद्द निर्माण केली. आणि स्त्री शिक्षणाचे स्वप्न सिद्ध केले. सर्व विरोध सोसत शिक्षणाच्या खडतर वाटेवर ठामपणे उभ्या राहिल्या. सावित्रीबाई म्हणजे समस्त स्त्री जातीची प्रेरणा आहेत.

समाजातील अज्ञानाचा काळोख दूर सारला. समाजातील स्त्रियांना, त्यांच्या जगण्याला अज्ञानतेची, अडाणीपणाची जळमटे लागली होती. ती जळमटे काढून स्त्रियांचा उद्धार केला. सर्व रूढी, प्रथा, परंपरेचे बंदपाश तोडले. सावित्रीबाईंनी शिक्षणाचे दालन खुले केले आणि स्त्रिया साक्षर झाल्या. स्त्रियांच्या अज्ञानतेच्या अंधारमय जगण्याला शिक्षणाची सोनेरी प्रगतीची पहाट व शैक्षणिक ऊर्जा मिळाली. समस्त स्त्रियांना, अस्पृशांना शिक्षण मिळावे यासाठी संघर्ष केला. समाजातील विधवा स्त्रियांचे केश वपन थांबविले जावे यासाठी न्हाव्यांचा संप घडवून आणला.

समाजातील अस्पृश्यता, सतिप्रथा, बालविवाह थांबविले. स्त्रियांच्या पुनर्विवाहास भरघोस असा पाठिंबा दिला. सावित्रीबाई शिक्षणाच्या तेजोमय प्रकाशात उजळून निघाल्या. त्यांनी साहित्यिक कार्यात खुप मोलाचे योगदान दिले. त्यांनी काव्य फुले व बावनकाशी सुबोध रत्नाकार हे काव्यसंग्रह प्रकाशित केले. पुण्यात सन १८९६-९७ मध्ये प्लेग रोग आला. त्यावेळी रुग्णांची सेवा करीत असताना सावित्रीबाईंनाही संसर्ग झाला. आणि त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुलेंनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षणासाठी व्यतीत केले. यशवंत बाळाला दत्तक घेऊन सावित्रीबाई सर्वश्रेष्ठ आई ठरल्या. शिक्षणासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. आणि आद्यशिक्षिका त्या शिक्षण प्रणेत्या ठरल्या.

डॉ.श्रीनिवास सुरंगे यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांतर्फे श्रद्धांजली

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – ''डॉ श्रीनिवास सुरंगे ह्यांनी संघाच्या शिकवणीप्रमाणे व्यक्तिनिर्माणाचे कार्य तर केलेच त्याच बरोबर भावी पिढीला संघ कार्यात जोडून देण्यासाठी अविरत परिश्रम घेतले.अनेक कार्यकर्ते घडवले.अनेक संस्थांना मदत केली.दांडगा जनसंपर्क,सकारात्मक वागणूक, कृत्रिम मर्यादांमध्ये न अडकता सर्वांशी प्रेमळपणे वागून, संपर्क व सहवासातून अनेक कार्यकर्ते घडविण्याचे कार्य डॉ सुरंगे यांनी केले व नवीन पिढीसाठी एक आदर्श निर्माण केला.त्यामुळे अनेक स्वयंसेवकांच्या हृदयात त्यांच्या स्मृती कायम राहतील.''असे प्रतिपादन राष्ट्र सेविका समितीच्या पूर्णवेळ प्रचारिका व केंद्रीय महिला समन्वय सहसंयोजिका भाग्यश्री साठे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ द्वारा आयोजित डॉक्टर श्रीनिवास सुरंगे यांच्या श्रद्धांजली सभेमध्ये केले.

ह्यावेळी छत्रपती संभाजीभागाचे भागसंघचालक अनिल व्यास यांची व्यासपीठावर मुख्य उपस्थिती होती. कर्वेनगरचे सहकार्यवाह महेश कुलकर्णी यांनी वैयक्तिक पद्य सादर केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने कर्वेनगर येथील कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालयामधील के बी जोशी सभागृहात आयोजित श्रद्धांजली सभेत त्यांचे पुत्र डॉ रवींद्र म्हणाले, ''माझे बाबा म्हणजे डॉ सुरंगे हे हाडाचे शिक्षक होते. आधुनिक वैद्यकशास्त्रावर त्यांचा विश्वास होता. माझे ज्ञान कोणासाठी कामाला यावे यासाठी त्यांनी जीवनभर ज्ञानदान केले मरणोत्तर देहदान व नेत्रदान करून समाजामध्ये व पुढील पिढीसाठी एक आदर्श निर्माण केला. बाबा नेहमी वर्तमान



काळातजगायचे.विज्ञाननिष्ठ, तर्कनिष्ठ,महिलांना सन्मान देणारे, समाजातील सर्व स्तरावरील व्यक्तींबरोबर माणुसकीने वागणारे,वाईट चालीरीतींना तिलांजली देणारे, उद्योगी, जिज्ञासू व प्रॅक्टिकल होते. त्यांना पब्लिक स्पीकिंग चे तंत्र ज्ञान अवगत होते. भारतभर वैद्यकीय महाविद्यालयात शिकवतांना अनेक डॉक्टर्स त्यांनी घडवले.पॉंडिचेरी येथे असतांना त्यांनी गणेश हिंदू परिषदेची स्थापना केली होती. सार्वजनिक गणपती उत्सव करून समाजाला एकत्र आणण्याचे काम त्यांनी केले.प्रतिकूल परिस्थितीत नोकरी सांभाळून, कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत जीवनामध्ये राष्ट्रभक्तीला प्राधान्य देत ते जगले व समाजामध्ये एक आदर्श निर्माण केला.''

यावेळी श्रीकांत करंजकर, मधुवंती जोगळेकर, सुहास दाबेकर, डॉ अभय हुपरीकर, शैलजा देशपांडे, प्रदीप फडके आदी मान्यवरांनी डॉक्टरांच्या जीवनशैलीविषयी व त्यांनी केलेल्या संघ कार्याविषयी माहिती देऊन आदरांजली वाहिली. शांतीमंत्र होऊन श्रद्धांजली सभा संपली. सभेस कर्वेनगर, कोथरूड सहित पुणे शहरातील तसेच राज्यातील अनेक स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाचा सामना करण्यासाठी .....

ज्योतिर्मय साहित्य

मित्र हो १९७२ चा दुष्काळ आणि यंदाचा म्हणजे २०२६-२०२७ मधील दुष्काळ यामध्ये एक खूप मोठा फरक आहे.

१९७२ च्या दुष्काळा मध्ये पाणी टंचाई नव्हती. त्यावेळी अन्न धान्याचा तुटवडा होता. म्हणून १९७२ मध्ये सुकडी, मिलो आपणांस खावे लागले होते.

यंदा अन्न धान्याचा तुडवडा असणार नाही परंतु पाणी टंचाई खूप जास्त प्रमाणात असू शकते. म्हणून कृपा करून खालील गोष्टी नीट लक्षात घ्या.

१) यंदा पिण्याच्या पाण्याचा व सांडपाण्याचा प्रश्न खूप गंभीर होऊ शकतो.

२) मुक्या जनावरांच्या पिण्याच्या व चाऱ्याचा प्रश्न खूप कठीण होणार आहे.

३) त्यामुळे सर्वांनीच पाणी अतिशय काटकसरीने वापरावे.

४) पैश्या पेक्षाही पाणी जास्त काटकसरीने वापरावे लागेल.

५) गाड्या धुण्यासाठी पाणी वापरणे बंद करावे. फारतर फार ओल्या कपड्याने गाड्या पुसून घ्याव्यात.

६) काही दिवसांनी दररोज अंघोळीसाठी पाणी मिळणे अवघड होऊ शकते. त्यामुळे दोन दिवसाआड / तीन दिवसाआड अंघोळ करावी लागेल, तशी मानसिकता आता पासूनच तयार करा .

७) कोणाकडेही नळ लिक होणार नाहीत याची काळजी घ्या. पाणी लिक होत असेल तर नळ दुरुस्ती ताबडतोब करून घ्यावी.

८) बऱ्याच जणांना पाण्याच्या कमतरतेमुळे उन्हाळ्यात स्थलांतर करावे लागू शकते .

९) चोऱ्या माऱ्याचे प्रमाण वाढू शकते. सावधगिरी बाळगा !

१०) विनाकारण पैसे खर्च करू नका.



अनावश्यक खर्च टाळा.

११) आमच्याकडे पैसे आहेत आम्ही टँकर घेऊ असा अहंकार होऊ देऊ नका. कारण टँकर वाल्याला सुद्धा पाणी मिळणे कठीण होऊ शकते .

१२) पाणी उपलब्धच नसेल तर तुमच्या जवळचे कागदाचे तुकडे (पैसे) पाणी देऊ शकणार नाहीत.

१३) भविष्यात पाण्याच्या टँकरचे भाव अव्वाच्या सव्वा कसे होणार नाहीत याकडे शासनाला लक्ष द्यावे लागेल.

१४) भीषण पाणी टंचाईमुळे सारखे सारखे कपडे धुवायला टाकू नका.

१५) स्वच्छता चांगलीच असते परंतु दुष्काळामुळे त्याला थोडा आळा घालावा लागेल. पाण्याची जास्त नासाडी करणाऱ्यावर पोलीस कारवाई होऊ शकते.

१६) जेवतांना पत्रावळींचा वापर करा, किंवा लहानपणी सारखं एका ताटलीत दोघांनी जेवायला बसावे.

१७) जेवणात जास्त पदार्थ करू नका म्हणजे भांडे घासायला कमी पडतील !

१८) सारखं सारखं चहा पिण्याची सवय कमी करा कारण कप बश्या विसळण्यासाठी खूप पाणी लागते .

१९) कोणाकडे पाहुणे म्हणून जातांना, किंवा शेजार्या कडे जातांना आपली आपली पाण्याची बाटली घेऊन जा.नसता वादविवाद, भांडणं होऊ शकतात. या गोष्टी हासण्यावर नेऊ नका. दुष्काळाचे, पाऊस पडला नाही याचे गांभीर्य लक्षात घ्या !

२०) शहरी भागात आता लवकरच बोअर आटतील .अत्यन्त कठीण काळ येणार आहे. सर्व फ्लॅट धारकांनी संयमाने वागावे.

२१) आजपर्यंत कधी नव्हे तो यंदा पाण्यावर पैसा खर्च करावा लागणार आहे. त्यासाठी मानसिक तयारी, व पैस्यांची तजवीज करून ठेवा .परंतु पैसे आहेत म्हणजे पाणी मिळेलच याची कुठलीही खात्री नाही.

२२) कोणाकडे पाहुणे म्हणून गेले तर टँकरचा खर्च काँट्रीब्युट करा.

२३) लक्षात घ्या ऑक्टोबर महिन्या पासूनच उन्हाळ्याला सुरुवात झाली आहे .म्हणजे यंदाचा उन्हाळा तब्बल नऊ/ दहा महिन्यांचा असणार आहे. आता पाऊस नऊ/ दहा महिन्यांनीच येईल, म्हणजे पाऊस जून २०२७ मध्येच येईल !



२४) जो काय पाणीसाठा आपल्याकडे उपलब्ध आहे त्याचे शासकीय यंत्रणेला व्यवस्थित नियोजन करून काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल !

२५) हे जरी खरे असले तरीही शासनाला , प्रशासनाला, नगरसेवकांना शिव्या श्याप देऊन काहीही होणार नाही. कारण पाणी कोणीही निर्माण करू शकत नाही. तेंव्हा सर्वांनीच पाणी काटकसरीने वापरावे, संयम ठेवावा, भांडण तंटे करू नयेत.

२६) मित्र हो येणारा काळ कठीण आहे. एकमेकांशी प्रेमाने, नम्रतेने व सहानुभूतीने वागूनच या नैसर्गिक आपत्तीस तोंड द्यावे लागेल. वादविवादाने पाण्याचा प्रश्न सोडवता येणार नाही. माया प्रेम, आपुलकी, संयम याच गोष्टी आपल्याला तारू शकतील.

२७) मुक्या जनावरांना जगवणे ही आपल्या सर्वांची जवाबदारी आहे.गाय, बैलं, वासरं, म्हशी, कुत्रे इत्यादी प्राणी चाऱ्या वाचून व पाण्यावाचून कसे मृत्युमुखी पडणार नाहीत यावर विचार करा, पुढाकार घ्या, काँट्रीब्युट करा आणि जनावरे वाचवण्यासाठी जीवतोडुन प्रयत्न करा.

२८) पाणी टंचाई हा प्रश्न कोण्या एका जाती धर्माचा नसून तो आपल्या सर्वांचा आहे, त्यामुळे सर्वांनी एकत्रित येऊन, मतभेद विसरून काम करा.

२९) कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा नेत्याला दोष देत न बसता या नैसर्गिक आपत्तीचा सामना सर्वांनी मिळून मिसळून करावा.

३०) भारत माझा देश आहे सारे भारतीय माझे बांधव आहेत. पाणी हे अमृत आहे आणि पाण्याचा प्रत्येक थेंब मी जपून वापरणार आहे. हीच भूमिका आपणां सर्वांना घ्यावी लागेल आणि या दुष्काळाचा, पाणी टंचाईचा सामना ''सर्वांना मिळून'' करावा लागेल !

धन्यवाद



।। गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया ।।

ज्योतिर्मय साहित्य

तुझे नाम मंगलमूर्ती, तूच इंद्र चंद्र ध्याती ।

विष्णू शंकर तुज पूजिती अव्यया घ्याती नित्य काही. ।।

हे गणराया, तुझे नाव मंगलमूर्ती आहे. इंद्र, चंद्र तुझे ध्यान करतात तर विष्णू, शंकर तुझी पूजा करतात. नित्य काळी सर्वजण तुझे ध्यान करतात आणि भक्ती करतात.

आज आपल्या शब्द विनायक या लेख मालिकेचा सातवा भाग. मागच्या भागात आपण भाद्रपद चतुर्थीची माहिती व महात्म्य पाहिले. आज आपण अश्विन महिन्यातील विनायकी चतुर्थीची माहिती व महात्म्य पाहणार आहोत.


अश्विन महिन्यातील विनायक चतुर्थी ही गणपतीला समर्पित आहे, याला अश्विन शुक्ल चतुर्थी असेही म्हणतात. या दिवशी विघ्नहर्ता गणपतीची पूजा केली जाते आणि व्रत पाळले जाते. ही चतुर्थी शारदीय नवरात्री दरम्यान येते. आज शारदीय नवरात्रीच्या चौथा दिवस. आज कुष्मांडा या अवताराची पूजा केली जाते. भगवान गणेशाला प्रसन्न करण्यासाठी हे व्रत पाळले जाते. या दिवशी गणेशाची पूजा करणे याला विशेष महत्त्व आहे. विनायकी चतुर्थी हे व्रत सर्व कार्यात



यश आणि सिद्धी प्रदान करणारे आहे.

चतुर्थी महात्म्य : दशरथ राजाच्या प्रार्थनेने वशिष्ठ मुनी प्रसन्न झाले व त्यांनी अश्विन शुक्ल चतुर्थीचे महात्म्य सांगायला सुरुवात केली.

मुनी म्हणाले, रैवता मधील एक प्रसिद्ध राजा जो धर्मज्ञ असून धर्माने राज्य करीत होता. त्याचे राजे खूप मोठे होते. राज्यात सर्व आनंदी होते. राजा धर्माने वागणारा आणि वैभव संपन्न होता असे सर्व असतानाही राजाच्या मनात मात्र दुःख साठलेले होते. त्याला पुत्र प्राप्ती झाली नव्हती. पुत्र व्हावा यासाठी राजाने व व्रत वैकल्य केली, तीर्थयात्रा केल्या पण त्या योगे राजाला पुत्र प्राप्त झाला नाही. निराश होऊन राजाने मग राज्याचा त्याग केला आणि पत्नीसह अरण्यात निघून गेला. राजा वनात हिंडत असताना त्यांना सौभरी ऋषीचा आश्रम दिसला. आश्रमात जाऊन दोघांनी ऋषींना नमस्कार केला. ऋषीनी त्यांना असे वनात हिंडण्याचे काय कारण आह असे विचारले. त्यावेळी राजाने आपल्या मनातील खंत ऋषींना सांगितली व मला पुत्र प्राप्तीसाठी काही उपाय आहे का असे विचारले. मुनीवर मी आज पर्यंत धर्माने वागलो. संत, ऋषी यांची सेवा केली मग माझ्या बाबतीतच असे का व्हावे. मला पुत्र का नसावा. ?



सौभरी ऋषींनी काही वेळ विचार करून सांगितले की, राजा पूर्व जन्मात तुझ्या हातून काहीतरी पाप झालेले आहे त्याचाच हा परिणाम आहे. तू चतुर्थीचे व्रत करीत नाहीस .जो मनुष्य चतुर्थीचे व्रत करीत नाही त्याचे अन्य व्रते सर्व निष्फळ होतात. या कारणाने तुला हे दुःख भोगावे लागत आहे. चतुर्थी ही वरदा आणि सर्व सुख देणारी असते.

मुनी पुढे सांगू लागले, राजा गाणपत्य शुक महायोगी माझ्या आश्रमात आले होते. त्यांनी मला विचारले ,असे घोर तप करून काय मिळवायचे आहे.? त्यावेळी त्यांनी मला एकाक्षर मंत्र दिला आणि चिंतामणीची भक्ती कर असे सांगून गणेशाचे नामस्मरण करीत निघून गेले. त्यांनी मला गणेशाची भक्ती करायला सांगितली. गणेशाच्या भक्तीत माझी दहा वर्षे निघून गेली.असेच एकदा गणेशाचे भजन करत असताना देव गजानन माझ्यासमोर प्रगट झाले. त्यांची पूजा करून विविध स्तोत्राचे पठण केले मग मला गाणपत्य पद देऊन ते निघून गेले. त्या दिवसापासून मी गणेशाची उपासना करीत आहे. सौभरी ऋषींनी राजाला षडाक्षरी मंत्राचा उपदेश दिला.

मुनिकडून मंत्राचा उपदेश घेतल्यानंतर राजा आपल्या राज्यात अश्विन शुक्ल द्वितीयेस परत आला. त्याच महिन्यातील चतुर्थीचे व्रत राजाने केले. राज्यातील सर्व प्रजांनानेही हे व्रत केले .या व्रताने राजाला पुत्र प्राप्त झाले. मुलगा वयात आल्यावर राजाने मुलाच्या हातात राज्यकारभार सोपविला.त्याला आनंदाने गादीवर बसून पत्नीसह गणेश भक्तीसाठी अरण्यात निघून गेला. असा हा अश्विन शुक्ल चतुर्थीचा महिमा आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559